# धडपड

जन्मापासूनच सगळेच प्राणी, पक्षी धडपड करत असतात जीवन चांगलं जगण्यासाठी .......

प्राणी पिलू जन्मतःच उभे राहण्याची तर मानवी पिलू हातपाय हलवून रडण्याची पहिली धडपड करतं, तेव्हापासून त्यांचा हा धडपडीचा प्रवास सुरु होतो तो त्यांच्या आयुष्याच्या शेवटापर्यंत!

त्या प्रवासात असंख्य छोट्यामोठ्या प्रसंगांना, संकटांना तोंड द्याव लागतं. प्रत्येक गोष्ट ही मनासारखी होत नसते. म्हणून सुखापेक्षा समाधान शोधा, आयुष्य आनंदात जाईल. आपली जीभ ही नेहमी शाबूत असलेल्या सर्व दातांवर लक्ष केंद्रित करण्याऐवजी हरवलेला दात शोधत असते. तसेच आपणही आपले आशीर्वाद मोजण्यापेक्षा जिवनातील कमी काय याकडेच लक्ष केंद्रित करतो.

मनातील ओझं कमी करण्याचं ठिकाण म्हणजे "मैत्री"! शिंपल्यासारखी खुप कमी लोक असतात या जगात जे दुसऱ्यांना मोत्यासारखं घडवायला स्वतःचा स्वार्थ बघत नाहीत. अशा माणसांना नेहमीच जपा. आयुष्य जोडण्याच्याच प्रयत्नात नेहमी रहा, मग ते नातं असो वा मैत्री! सुई बनून जगा. कात्री नाही. कारण सुई नेहमी दोनाचा एक तर कात्री एकाचे दोन!

लक्षात ठेवा, केवळ धडपड करत सगळ्यांना मिळतो आयुष्य बदलण्यासाठी, पण कितीही धडपड केली तरी आयुष्य पुन्हा मिळत नाही वेळ बदलण्यासाठी! सर्वात सुंदर नातं हे आपुलकीचं असतं. त्यासाठी धडपडत रहा, त्यातला आनंद घ्या आणि वाटा. त्यातच खरे सुख, समाधान आहे. आपल्या धडपडीच चीज झाल्याचं लक्षात येईल!

सौ. उज्वला प्रभुणे.